**ललिता गंडभीर**
Lalita Gandbhir.
4200 North Ocean Drive.
1501-2
Riviera Beach, FL. 33504.
U. S. A.

# सुवर्णमध्य - भाग १

खूप काटकसर करून आणि प्रत्येकी दोन दोन नोकऱ्या करून आम्ही पैसे साठवले आणि छोटेसे का होईना एक घर घेतले. घर अमेरिकेतल्या मोठ्या (Metropoliton ) मेट्रोपॉलिटन शहरापासून, बॉस्टनपासून बरेच दूर, एका नव्या उपनगरात होते. या सर्व कारणाने ते स्वस्त होते. तेही घेताना आम्हाला खरे तर जडच गेले. बहिणीकडून पैसे उसने घ्यावे लागले. पण एकदाचे घर घेतल्यावर मला हर्षवायू झाला. ते 'चिमुकले' घर माझ्या दृष्टीने राजवाड्यासारखेच होते. शिवाय ते घेतल्यावर माझी एक मोठी काळजी मिटली होती.

त्याचे असे झाले की, माझी बहिण अमेरिकन सिटीझन होती. तिने स्पॉन्सर केल्यामुळे आमच्या कुटुंबाला व्हिसा मिळाला होता. इकडे आल्यावर संजयला, माझ्या नवऱ्याला एका लहान दुकानाचा मॅनेजर म्हणून नोकरीही मिळाली. त्याच्या मिळकतीमध्ये आम्हाला एक बेडरूमचा जुन्या बिल्डींगमधला छोटा अपार्टमेंट घ्यायला जेमतेम जमले होते. तो अपार्टमेंट हमरस्त्यावर असल्याने पुढे फार रहदारी होती. आमच्या दोन मुलांना - चंदू व नंदूला - शाळेत लांब चालत जावे लागत असे. रहदारीमुळे मला तर नेहमी त्याची काळजी वाटायची.

नंतर आम्हाला शोध लागला की अमेरिकेतील बहुतेक लोक मुलं झाली की घर घेतात. घराची किंमत वाढते, पैसे, आपोआप हप्त्यांमुळे शिलकीत पडल्या प्रमाणे वाचतात, मुलांना खेळायला अंगण मिळते. ही झाली घरखरेदीची काही गौण कारणे. पण महत्वाचे कारण बहुतेक उपनगरातल्या शाळा चांगल्या असतात. त्यामुळे मुलांना शिक्षण वरच्या दर्जाचे मिळते.

हे सर्व ज्ञान झाल्यावर 'पैसे साठवून घर घ्यायचे' या हेतूने संजयने आणखी एक पार्टटाईम नोकरी धरली आणि मीही एका दुकानात कॅशियर म्हणून नोकरी करू लागले. माझ्या नोकरीमुळे नंदू व चंदूला दोन तास अपार्टमेंटमध्ये, शाळेतून परत आल्यावर एकटेच राहावे लागत असे. त्यामुळे पण मला 'कधी एकदा आपण घर घेतो आणि ही नोकरी सोडतो' असे वाटत राहायचे.

अखेर शेवटी पहिला मोठा हप्प्ता (Down payment) देण्याइतके पैसे जमले व आमचे घर घेण्याचे स्वप्न पुरे झाले. आमचे उपनगर, ब्रूक-फिल्ड यात मध्यम वर्गीयांची वस्ती होती. आमचे घर त्यातल्या त्यातही स्वस्त विभागात होते- (Low Middle Class). संजय इतर आलेल्या बऱ्याच भारतीयांप्रमाणे डॉक्टर किंवा इंजिनियर नसल्याने आमच्या बेताच्या मिळकतीत

आणखी अपेक्षा ठेवणे चुकीचेच होते. एकूण ब्रूकफिल्डमध्ये राहायला मिळणार म्हणून मी आनंदात होते.

नव्या घरात राहिल्या गेल्याबरोबर तिसऱ्या दिवशीच माझी एक शेजारीण मॉनिका सकाळी दहा वाजता उगवली. येताना ती इकडच्या नव्या शेजाऱ्यांचे स्वागत करण्याच्या पद्धतीप्रमाणे केक घेऊन आली होती. मी दरवाजा उघडताच ती हसत हसत, "हॅलो, मी मॉनिका" म्हणत आत आली. दोन्ही हातांनी माझा हात पकडून हस्तांदोलन करीत मला बोलण्याची संधी न देता धबधबा वाहिल्याप्रमाणे बोलू लागली, 'मी तुझ्या शेजारीच राहते. ते पाहिलंस का,' तिने खिडकीत बोट दाखवले व म्हणाली, 'ते पांढऱ्या रंगाचे घर माझे. मला इथं राहायला येऊन सात-आठ वर्षे झाली. माझे दोन्ही मुलगे पण तुझ्या मुलांच्याच वयाचे आहेत. आपल्या दोघीनाही ते फार सोयीचे होईल. आपण त्यांना कब स्काऊटला, पोहायला आळीपाळीने पोचवू. तुझा आणि माझा वेळ वाचेल त्यामुळे. तुला गुलाबाची फुलं आवडतात का? मला फार हौस आहे; गुलाबाच्या फुलांची. तुझ्या घरापुढे एक कोपरा आहे ना तिथे सबंध दिवस सूर्यप्रकाश येतो. तिथे गुलाबाची फुले लावायला रोप देईन मी तुला.' मग ती एक क्षण थांबली आणि, 'काय बडबडतेय मी ? तुझं नाव विचारायला सुद्धा विसरले. हे बघ तू यापुढे मी अशी बडबड करायला लागले की मला थांबव. कारसारखा मलासुद्धा ब्रेक लावायला लागतो. सांग ना तुझं नाव काय ?' ती मला विचारू लागली.

माझे तिच्या बडबडीकडे लक्ष होतेच कुठे? मी तिच्याकडे पाहताच राहिले होते. गुलाबी गोरा रंग, गर्द निळे डोळे, गोल चेहेरा, नाजूक जिवणी, दाट पापण्या, सोनेरी सूर्यप्रकाशात चमकणारे केस, अपरे नाक, रेखीव कमनीय बांधा. मॉनिका लाखात एक होती. तिच्या बोलण्याने मी भानावर आले.

'माझं नाव रीना. मी भारतीय आहे.' ती 'तू कुठून आलीस?' असा प्रश्न विचारणार या अपेक्षेने मी आधीच सांगून टाकले. इतर अमेरिकनांप्रमाणे ती आता भारताविषयी प्रश्न विचारायला सुरवात करणार असा मी अंदाज बांधला. पण तो साफ चुकीचा ठरला मग माझ्याच घरात मलाच हात धरून खाली बसवत तिने जाते जाते म्हणत आणखी अर्धा तास मुलांची शाळा, त्यांचे गेम्स, आपला नवरा, हवा अशा विषयांवर बडबड केली. शेवटी 'उद्या सकाळी दहा वाजता ये हं कॉफीला.' असे आमंत्रण मला देऊन ती 'बाय बाय' करून निघून गेली.

संजय संध्याकाळी परत आल्यावर मी त्याला शूज काढायचीही संधी न देता घाई घाईने माझ्या नव्या मैत्रिणीविषयीची सर्व हकीकत सांगून टाकली. माझी टकळी ऐकून तो हसला व म्हणाला,

"तुझ्यासारखीच बडबडी मैत्रीण भेटल्याचा खरा आनंद झालाय तुला. तुझं बस्तान इथे आता नीट बसेल. काही लागलं तर मदतीला मैत्रीण आहेच. उत्तम झालं."

मॉनिकाचे दोन मोठे मुलगे बिल व बॉब आणि माझे दोन मुलगे चंदू व नंदू एकाच वयाचे होते. त्यामुळे त्यांचीही ताबडतोब मैत्री झाली. मुलांच्या निमित्ताने आमचा एकमेकींशी बराच संबंध येऊ लागला. जरुरी पडल्यास एकमेकींच्या मुलांना सांभाळणे, बाजारहाट, मुलांना

शाळेतून आणणे पोहोचवणे वगैरे काम आम्ही एकमेकींसाठी करू लागलो. शिवाय मॉनिकाला माझ्यासारखीच पुस्तक वाचायची, फुलझाडांची, वेगवेगळे पदार्थ करून बघायची हौस होती. या सर्व कारणांमुळेच आमची लवकर घनदाट मैत्री झाली.

आमच्या आसपास राहणारी इतर कुटुंबे पण साधारण परिस्थितीतलीच होती. बहुतेकांच्याकडे एकच कार होती. बायकांना दिवसा कारची जरुरी लागली तर त्या नवऱ्याला कामावर पोचवून कार परत घेऊन येत. आठवड्यातून, पंधरा दिवसांतून एकदा तरी मॉनिका कार घेउन परत येत असे. पहिले काही महिने मी घर लागेपर्यंत नोकरी करत नव्हते. म्हणून ही गोष्ट माझ्या लक्षात आली. मधून मधून तिला परतायला उशीर व्हायचा. मग तिची मुले शाळेतून परत येऊन कधी माझ्याकडे खेळत, कधी ती बेबीसीटर बोलावत असे, कधी दुसऱ्या बाईकडे मुलांना पाठवत असे.

हळूहळू आसपासच्या इतर बायकांशीही माझ्या ओळखी झाल्या. त्यांच्याकडून मला मॉनिका अनाथाश्रमात वाढली व स्कॉलरशिपवर कॉलेजात गेली ही बातमी मिळाली. त्यांच्यामध्येही मॉनिकाच्या ह्या दिवसभर जाण्याविषयी कुजबूज चालत असे. मॉनिका कुठे जाते याचे सर्वांनाच कुतूहल होते. परंतु तिला अजूनपर्यंत उघडउघड विचारायचे धाडस कुणी केले नव्हते.

एक दिवस मॉनिकानेच मला विचारले, “तू माझ्याबरोबर परवा बॉस्टनला येशील का? मला कॉलेजमध्ये असल्यापासून आठवड्यातून एक दिवस शॉपिंग करायची सवय लागली आहे. सवय कसली? व्यसनच झालंय ते एक प्रकारचं. या आठवड्यात मी जेनला विचारलंय. शाळेतून आल्यावर ती आपल्या मुलांना सांभाळेल. आपण दोघी जाऊ.”

माझाकडे काही खरेदीसाठी पैसे नव्हते पण शॉपिंगची मला विलक्षण हौस होती. गावात डाऊनटाऊनमध्ये प्रचंड दुकाने होती. त्यांचा मला मोह होताच. एक दिवस नेहमीच्या कार्यक्रमातून मोकळीक होईल व मजा येईल असा विचार करून मीही संमती दिली. खरे सांगायचे तर माझा आणखीही एक अंतर्गत हेतु होताच. मॉनिका बॉस्टनला जाऊन दर आठवड्यास काय विकत घेते, किती पैसे खर्च करते, तिला दर आठवड्याला पेट्रोलचे पैसे खर्च करून डाऊनटाऊनला साठ मैल जायला परवडते तरी कसे अशा अनेक शंकाकुशंका माझ्या मनात होत्या. त्यात आजूबाजूच्या बायकांच्या कुजबुजीतून आणखी काही खवचट प्रश्नांची भर पडली होती. त्या सर्वांचे निरसन करून घ्यायची ही संधी मला साधायची होती.

“संजय, परवा मॉनिकाने मला डाऊनटाउनला शॉपिंगला बोलावले आहे. मी येते म्हणून सांगितलंय” संजय घरी आल्यावर मी त्याला म्हटले.

“वा ! वा !! खुशाल जा. तुला शॉपिंग आवडतंच. फक्त खरं शॉपिंग करू नकोस. विंडो शॉपिंग कर म्हणजे झालं !” त्याने उदारपणे परवानगी दिली.

“शॉपिंग तर आहेच. शिवाय…..” मी चुकून बोलले आणि जीभ चावली.

“शिवाय काय ?” संजय मी काही तरी लपवते आहे हे लगेच समजला.

“दर आठवड्याला मॉनिका डाऊनटाउनला जाऊन काय करते ह्याचा शोध लावायचाच आहे मला.” मी सरळ सांगून टाकले.

“हेच तुझं चुकतं. ती काय करते ह्याच्याशी तुझा संबंध आहे का? आपण बरं आपलं काम बरं अशा रीतीने राहायचे सोडून नसत्या भानगडीत तोंड घालायची तुला सवय आहे. ‘व्हॉट शी डज इज नन ऑफ युवर बिझनेस !’ संजय चिडून म्हणाला. ‘शिवाय तुझी ती मैत्रीण आहे ना?’ तिच्यावर हेरगिरी करून सांगणार तर नाहीस न सर्वांना?”

“नाही नाही,” मी कबूल केले.

मॉनिका बरोबर मी गेले, तेव्हा विशेष काहीच घडले नाही. मी वस्तू, कपडे बघण्यात गर्क होते. मॉनिका माझ्याबरोबर होती. तिला वस्तू बघण्यात काही गम्य आहे असे मला दिसले नाही. आम्ही पुस्तकांच्या दुकानात गेलो. तिथे तिने दोन पुस्तके विकत घेतली. लंचनंतर ‘तू ह्या दुकानात शॉपिंग करत राहा. मी बँकेत जाऊन येते.’ असे म्हणून ती दुकानासमोरच्या बँकेत गेली. तिथून परत यायला तिला चांगला तासभर लागला. मी विचारल्यावर ‘हिशेबात गोंधळ झाला होता’ असे म्हणाली.

आम्ही परत आल्यावर आसपासच्या बायकांनी बरेच प्रश्न विचारले. माझ्या उत्तरांनी त्यांची निराशाच झाली असे मला वाटले. मी मधून मधून मॉनिकाबरोबर जात राहिले. मॉनिकाने नंतर एकदोनदा शेजारच्या जेनला आणि लिंडाला सुद्धा बोलावले आणि मॉनिकाच्या गावातले फेऱ्यांविषयीचे तर्ककुतर्क थांबले. मॉनिका बँकेत बराच वेळ लावते हे माझ्या लक्षात आले होते. पण ती ‘तिथेच चेकबुकचे हिशेब करते, तिचे गणित कच्चे आहे’ असे मी स्वतःला सांगून आपले समाधान करून घेतले होते. अशीच दोन वर्षे गेली. एकदा मॉनिका फ्ल्यूने खूप आजारी झाली. मी सारखी तिच्याजवळच बसून राहिले. आजारपणात तिच्या डोळ्यांत एकदा पाणी आले. ‘माझ्याजवळ आजारात असं कधी कुणीही बसलं नाही !’ ती म्हणाली. ‘तू माझी हरवलेली बहिण आहेस.’ ह्या वाक्यावरून तिला एक हरवलेली बहिण आहे असा मी अंदाज केला.

घर घेतल्यावर सहाच महिन्यांनी मी पार्टटाईम नोकरी करायला सुरवात केली. पण पैसे काही शिल्लक राहात नव्हते. एकदा मला बहिणीचा अकस्मात फोन आला. तिला तिने दिलेल्या पैशातले दोन हजार रुपये परत हवे होते. त्यांना नवे घर घ्यायचे होते. त्यासाठी डाऊनपेमेंटला पैसे कमी पडत होते. त्यामुळे मी तर एकदम संचितच झाले. आमच्याकडे तर शंभर डॉलर्ससुद्धा नव्हते. बहिणीचे पैसे घेऊन दोन वर्षे उलटली होती. तिला काय सांगायचे? ‘पैसे पाठवते’ असे सांगून मी काळजीत बसून राहिले. एवढ्यात मॉनिका आली. तिला मी काळजीत आहे हे लगेच समजले. मी कारण सांगत नव्हते पण तिने खोदून खोदून विचारले. ‘तू माझी जिवलग मैत्रीण. मला नाहीतर कोणाला सांगणार?’ असे ती म्हणाली. शेवटी मी कारण सांगितल्यावर ती फार गंभीर झाली व माझ्यासारखीच सचिंत बसून राहिली. शेवटी मी कॉफी करायला उठले. कॉफी करून परत आले तेव्हा मॉनिकाच्या चेहेऱ्यावर काहीतरी निश्चय दिसत होता. “रीना” ती हलकेच कॉफीचा कप घेत म्हणाली, “मी देते तुला दोन हजार रुपये. तू हवे तेव्हा परत दे मला. पण

माझी एक अट आहे. कुणाला म्हणजे कुणाला, अगदी संजयला सुद्धा मी पैसे दिले हे सांगायचं नाही.”

“तू कुठून आणशील दोन हजार?” मी विचारले.

“ते मला तुला सांगता येणार नाही. पण तुला कॅश देईन.”

“ छे ! छे! “मी म्हटले, ‘मी एवढे पैसे कसे घेऊ? आणि संजयला कुठून आणले म्हणून सांगू?”

“सांग तू गेल्या दोन वर्षात थोडे-थोडे जमवलेस म्हणून. मी तुला आता दोनशे दिले म्हणायला ही काही हरकत नाही.”

मी खूप नाही म्हटले पण तिने ऐकले नाही. ती दोन हजार घेऊन पुढच्या आठवड्यात आलीच. संजय मी एवढे पैसे वाचवले हे ऐकून फारच खूष झाला. त्या खुशीतच त्याने मी त्याच्यापासून पैसे लपवले या माझ्या अपराधाकडे दुर्लक्ष्य केले. मी बहिणीचे पैसे परत केले आणि मॉनिकाचे पैसे दर आठवड्याला पाच ते दहा डॉलर्स या गतीने परत करायलाही सुरवात केली.

या घटनेनंतर मॉनिकाचा अधून मधून खटकणारा वेगळेपणा मला आता प्रकर्षाने जाणवू लागला. ती शॉपिंगला जायची खरी पण तिला शॉपिंगमध्ये थोडाही रस नव्हता. आम्हा सर्व बायकांप्रमाणे ती पैसे मोजून मापून खर्च करत नव्हती. आमच्या वस्तीतले कधी कधी युरोपात बर्म्युडाला वगैरे क्वचितच सुट्टीला जात असे. कारण एवढा खर्च कुणाला परवडण्यासारखा नव्हता. यदाकदाचित कुणी गेलेच तर आम्हा सर्वांना त्यांच्या सुट्टीविषयी, अनुभवांविषयी माहिती करून घेण्याची फार उत्सुकता असे. मॉनिका या बाबतीत पूर्ण उदास होती. शिवाय आता तिच्या बॉस्टनमधल्या फेऱ्या व बँकेत घालवलेला वेळ यामागेही काहीतरी गूढ असावे असे मला वाटू लागले. तिच्या वेगळेपणाचे गूढ तिच्या रहस्यात असणार असा मी तर्क केला. एकदाच मॉनिकाला बँकेतून यायला फार उशीर झाला म्हणून मी बँकेत गेले होते तेव्हा मॉनिका बँकेच्या बाहेरच्या दालनात नव्हती. तिचा व्यवहार आम्हा सर्वांप्रमाणे बँकेच्या सार्वजनिक विभागात होत नव्हता. मी इकडे तिकडे पाहात उभी राहिले. तेव्हा मॉनिका बँकेच्या आतील भागात जाणाऱ्या दरवाज्यातून बाहेर पडली. ती बाहेर येताना एका सुटाबुटातल्या पुरुषाने तिच्यासाठी दरवाजा अदबीने उघडला व ती निघताना किंचित वाकून त्याने तिला अभिवादन केले. हा प्रसंग माझ्या मनावर ठसला. मॉनिकाच्या रहस्याचा उलगडा ती बँकेत काय करते हे कळले तर होईल अशी मी मनात खुणगाठ मारली होती. हे सर्व तर्क संजयला सांगायचे मी टाळले कारण मॉनिकाला मी शब्द दिला होता.

(क्रमश:)

पूर्वप्रसिद्धी : माहेर, ऑगस्ट १९८६ .
तारेवरची कसरत, विद्या प्रकाशन, जून १९८७.